# शासकीय तंत्र निकेतन, मुंबई

(महाराष्ट्र शासनाची शैक्षणिक स्वायत्त संस्था)

४९, खेरवाडी, अली यावर जंग मार्ग, वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०००५१

संकेत स्थळ: www.gpmumbai.ac.in
प्राचार्य ई मेल :principal@gpmumbai.ac.in;
principal.gpmumbai@dtemaharashtra.gov.in

ई मेल : gpmumbai@gpmumbai.ac.in
कार्यालय ई मेल: office.gpmumbai@dtemaharashtra.gov.in


## परिक्षा विभाग

जाक्र: शातंमु./१०.०९/२०२२/ 149 दिनांक : 30 AUG 2022

## महत्वाचे परिपत्रक

प्रति,

विभाग प्रमुख

स्थापत्य/संगणक/अणुविद्युत/विद्युत/उपकरणीकरण/यंत्र/माहिती तंत्रज्ञान/रब्बर/चर्म कला

**विषय** : Even Term 2021-22 अंतिम सत्र/वर्षातील अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांच्या फेरपरिक्षा घेणेबाबत.

**संदर्भ** : जा. क्र. मरातंशिमं/का-40/वि.स./उ.प.२२/१७८ दिनांक: २५/०८/२०२२.

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने माननीय मंत्री महोदय उच्च व तंत्रशिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन यांनी विधान मंडळ अधिवेशनात दिनांक २४/०८/२०२२ रोजी केलेल्या निवेदनाच्या अनुषंगाने EVEN TERM END 2021-22 परीक्षेमध्ये अंतिम सत्र वर्षातील अनुत्तीर्ण / बॅकलॉग विषयाची फेरपरिक्षा अपवादात्मक परिस्थितीत विशेष बाब म्हणून आयोजित करण्यात येत आहे.

१) फेरपरीक्षेबाबतचे **संक्षिप्त वेळापत्रक:**

| अ.क्र. | फेरपरीक्षेचे तपशिल | कालावधी |
|---|---|---|
| १ | Re-Exam Registration | ०५ ते ०७ सप्टेंबर, २०२२ |
| २ | Re-Exam Fees | १५००/- |
| ३ | Oral / Practical Exam | १२ सप्टेंबर, २०२२ |
| ४ | Theory Exam | १५ ते २० सप्टेंबर, २०२२ |

२) **फेरपरीक्षेबाबतचे महत्वाच्या सूचना:**

i) ज्या विद्यार्थ्यांनी EVEN TERM END EXAM 2021-22 करिता अंतिम सत्र वर्षातील तसेच त्यांचे असलेले बॅकलॉग विषयांच्या परीक्षा करीता Exam Registration केले होते, तसेच EVEN TERM END EXAM 2021-22 **चा निकाल Fail असा असेल अशाच विद्यार्थ्यांना त्यांच्या अनुत्तीर्ण विषयांकरीता फेरपरीक्षेची संधी देण्यात येणार आहे.**

ii) फेरपरीक्षेच्या संधीचा लाभ घेण्यासाठी पात्र विद्यार्थ्यांनी मुद्दा क्र. १ मध्ये नमूद केल्याप्रमाणे Re-Exam Registration वेळापत्रकानुसार तसेच Re-Exam परीक्षा शुल्कासह भरणे अनिवार्य राहील.

iii) नियमित EVEN TERM END EXAM २०२२ चा अंतिम सत्र / वर्षातील Reassessment चा निकाला नंतर फेरपरीक्षेकरीता परीक्षा अर्ज भरलेली विद्यार्थी ज्या विषयात उत्तीर्ण होतील अशा विषयांची फेरपरीक्षा होणार नाही, तसेच संबंधित विद्यार्थ्यांच्या फेरपरीक्षा Hall Ticket मधून उत्तीर्ण झालेले विषय वगळण्यात येईल.

iv) दिव्यांग विद्यार्थ्यांकरीता संस्थेच्या परीक्षाविषयक नियमावलीतील AR-41 नुसार सोयीसुविधा देण्यात येतील. संस्थामार्फत अशा दिव्यांग विद्यार्थ्यांना सोयीसुविधा पुरवण्यात याव्यात.

v) EVEN TERM END EXAM २०२२ दरम्यान गैरप्रकार (Copy Case) प्रकरणी शिक्षा झालेले अंतिम सत्र वर्षातील विद्यार्थी संस्थेच्या परीक्षाविषयक नियमावलीतील AR-30A नुसार सदर फेरपरीक्षेकारिता पात्र असणार नाहीत.

vi) सदर फेरपरीक्षेदरम्यान कोणताही गैरप्रकार होणार नाही, याची दक्षता घावी. परीक्षेदरम्यान गैरवर्तन झाल्यास संस्थेच्या परीक्षा विषयक नियमावलीतील AR-30A मधील तरतुदीनुसार कार्यवाही करण्यात येईल. याबाबत आपल्या संस्थेतील विद्यार्थी, अध्यापक व इतर कर्मचारी यांना अवगत करावे.

vii) शैक्षणिक वर्ष २०२२-२३ चे ODD TERM END EXAM 2022-23 हि परीक्षासुद्धा माहे नोव्हेंबर, २०२२ मध्ये घेण्याबाबत संस्थेच्या शैक्षणिक वेळापत्राकान्वये घोषित करण्यात आलेले आहे. त्यामुळे सदर शैक्षणिक कामकाज सुरळीत सुरु ठेवणे गरजेचे असल्याने

सदर फेरपरीक्षेच्या निकालानंतर गुणपडताळणी, फोटोकॉपी व पुनर्गुणमूल्यांकनाची सुविधा देण्यात येणार नाही.

३) **अंतिम सत्र / वर्षाकरिता अनुत्तीर्ण** विद्यार्थ्यांना **त्यांच्या अनुत्तीर्ण विषयांचे आकलन** सुयोग्याप्रकारे **होण्याच्या दृष्टीने अशा सर्व** विद्यार्थ्यांकरिता विषयनिहाय **अतिरीक्त अध्यापन वर्ग** विभागस्तरावर **आयोजित करावे. सदर वर्गास** विद्यार्थ्यांची **उपस्थिती** राहण्याकरिता **संबंधित अध्यापकांनी** विद्यार्थ्यांना **प्रोत्साहित करावे. संस्थेद्वारे निर्धारित केलेल्या फेरपरीक्षा** आयोजानापुर्वी विभागस्तरावर **अशा** विद्यार्थ्यांकरिता **सराव परीक्षा आयोजित करावी. या अनुषंगाने करावयाच्या सविस्तर** कार्यवाहीबाबत **मंडळाच्या दि. २४/०८/२०२२ च्या महत्वाचे** परिपत्रकान्वये **सर्व विभागस निर्देशित करण्यात आलेले आहे.**

तरी संबंधित विभागातील विभागप्रमुखांना सूचित करण्यात येते कि, वरील सर्व बाबी विद्यार्थी व त्यांचे पालक यांना अवगत करून द्याव्यात, तसेच विद्यार्थ्यांना फेरपरीक्षेबाबत योग्य ते मार्गदर्शन करावे.

प्राचार्य

शासकीय तंत्रनिकेतन, मुंबई